जिल्हाधिकारी [दारूबंदी व उत्पादन शुल्क विभाग] ............... यांचे कार्यालय.

क्रमांक-सीएलआर-१०८९/ ८
[ जिल्ह्याच्या ठिकाणाचे नांव व दिनांक लिहावा. ]

जाहिरनामा

तमाम लोकांना कळविण्यात येतेकी, ............ [जिल्ह्याचे नांव] या जिल्ह्यांत देशी मद्य किरकोळ विक्री करीता सोबत जोडलेल्या यादीत दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र देशी दारू नियमावली १९७३ चा नियम २३-अ अन्वये नेमून दिलेल्या निवड समितीच्या उपस्थितीत " लॉटरी सोडत "पध्दतीने देशी दारूची किरकोळ विक्री दुकाने [सी. एल. ३ अनुज्ञप्ती] द्यावयाची आहे व त्यासाठी इच्छुक व्यक्तीकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज दिनांक ............ पासून दिनांक पर्यंत ............... अधीक्षक, दारूबंदी व उत्पादन शुल्क, यांच्या कार्यालयात [पूर्ण पत्ता लिहीणे ] कामाचे दिवशी दररोज सकाळी ११.०० ते सायंकाळी ४-३० पर्यन्त स्वीकारण्यात येतील.

एका व्यक्तीस एका किंवा अनेक दुकानाकरिता वेगवेगळा प्रत्येकी फक्त एक स्वतंत्र अर्ज करण्याची मुभा आहे. मात्र प्रत्येक अर्जासोबत अनुज्ञप्ती शुल्कासह सर्व कागदपत्रांची स्वतंत्र पूर्तता करावी लागेल व सर्व अर्जाबाबत पुढील अटी लागू राहतील.

अर्ज करण्याची पध्दत आणि सोबत जोडावयाची कागदपत्रे पुढील प्रमाणे राहतील :-

१] महाराष्ट्र देशी मद्य नियमावली, १९७३ चा नियम २३ अंतर्गत विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज [सी. एल. अ-१]

२] अर्जास ६५ पैसे किंमतीचा न्यायालयीन मुद्रांक [कोर्ट फी स्टॅम्प] लावणे आवश्यक आहे.

३] अर्जासोबत पुढीलप्रमाणे लागू असेल ते अर्जाचे शुल्क शासकीय कोषागारांत भरलेल्या चलनाची मूळ प्रत जोडावी.

ज्या गावातील शहरातील दुकानाकरिता अर्ज केला असेल त्या गावाची लोकसंख्या जर :-

अर्जाचे शुल्क
१] दोन लाख [२,००,००० ] पेक्षा कमी असेल - रु. ५००/-
२] दोन लाख [२,००,००० ]व त्यापेक्षाजास्त असेल. - रु. १,०००/-

२/-

टीप :- अर्जाचे वरीलप्रमाणे शुल्क भरण्याकरिता १९८१ च्या जनगणनेनुसार मोजलेली लोकसंख्या आधारभूत धरण्यात येईल.

४] अर्जदार जर भागीदारी संस्था असेल तर भागीदारी पत्राची प्रमाणित प्रत किंवा अर्जदार खाजगी मर्यादित/सार्वजनिक मर्यादित/ सहकारी संस्था असेल तर प्रचलित कायद्याखाली नोंदणी केलेल्या दाखल्याची प्रमाणित प्रत.

५] अर्जदार व त्याचे सर्व भागीदार महाराष्ट्राचे अधिवासी [ ] असल्याबाबतचा पुरावा [समक्ष अधिकाऱ्याने दिलेले] [" डोमिसाइल सर्टीफिकेट "]

६] अर्ज करते वेळी दुकानाकरिता जागा सुचविणे अर्जदारावर बंधनकारक नाही. परंतु एखाद्या अर्जदाराने जागा सुचविली असल्यास त्यांनी जागेच्या नकाशाच्या [ब्लु प्रिंट] तीन प्रती आणि जागेच्या मालकाची जागेवरील हक्क दर्शविणारा पुरावा आणि जागा मालकाचे सदरील जागेत मद्य विक्रीचे दुकान चालविण्यास हरकत नसल्याचे संमती पत्र अर्जासोबत जोडावे.

७] अर्जदार आणि अर्जदाराचे भागीदार हे उत्पादन शुल्क, आयकर आणि विक्रीकर थकबाकी मुक्त असल्याबाबतचा संबंधीत खात्याचा दाखला किंवा अर्जदाराचे त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

८] जे अर्जदार किंवा त्याचे कुटुंबिय शासन आदेश, गृहविभाग, क्रमांक-डीसएनएस ०८७९/ ४१७८/१८६/पीआरओ-१, दिनांक ९. १. ८०, अन्वये घोषित केलेल्या अनुसूचित अनुज्ञप्त्यांपैकी नमुना सी. एल-३ अनुज्ञप्ती धारण करीत असतील ते अनुज्ञप्तीधारक, मुंबई उच्च न्यायालयाच्या दावा क्रमांक-३७४/१९८१ च्या निकाला अन्वये एकापेक्षा अधिक सी. एल. -३ अनुज्ञप्त्या धारण करण्यास पात्र आहेत. उच्च न्यायालयाच्या या निकाला विरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल केला असून सध्या सी. एल. ३/एम. एफ. २ अनुज्ञप्ती धारण करणाऱ्या व्यक्तीस नवीन सी. एल. -३ अनुज्ञप्ती मंजूर झाल्यास, त्या व्यक्तीवर सर्वोच्च न्यायालयाचा निकाल बंधनकारक राहील. अशा अनुज्ञप्तीधारकांना नवीन अनुज्ञप्ती मंजूर करतांना व न्यायालयाचा निकाल लागेपर्यन्त त्या अनुज्ञप्ती अनुज्ञप्त्यांचे नुतनीकरण करतांना दरवेळी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील असे प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.

उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निकालाप्रमाणे सी. एल. ३, एम. एफ. २ अनुज्ञप्ती व्यतिरिक्त इतर अनुसूचित अनुज्ञप्ती धारण करणारी व्यक्ती नवीन सी. एल-३ अनुज्ञप्ती धारण करण्यात अपात्र आहे.

३/-

९] अर्जदाराने किमान रुपये १५,०००/- [पंधरा हजार] चे ऐपत प्रमाणपत्र किंवा बँक गॅरंटीची मूळ प्रत अर्जासोबत जोडावी.

१०] अर्जाच्या शुल्काशिवाय प्राप्त झालेल्या अर्जाचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

११] अर्जदारांना किंवा भागीदार यांना मुंबई दारुबंदी कायदा, १९४९चे कलम ५४[१] [ड]मध्ये उल्लेख केलेल्या कायद्याखाली शिक्षा झाली असल्यास त्याची माहिती देण्यात यावी व शिक्षा झाली नसल्यास अर्जदार व त्याचे भागीदार यांनी विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्रे स्वाक्षरी करुन अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. अर्जदाराची अनुज्ञप्ती देण्यासाठी निवड झाल्यानंतर त्याचे पूर्वचारित्र्य दोषास्पद आढळल्यास निवड रद्द समजण्यात येईल.

१२] अर्जदार किंवा त्यांच्या भागीदारांना मुंबई दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत किंवा अन्न व औषध प्रशासन विभागाची पूर्वी मंजूर करण्यात आलेली अनुज्ञप्ती अनुज्ञप्तीची अट किंवा नियमाचा भंग केल्यामुळे रद्द करण्यात आली असल्यास कोणत्या कारणासाठी याबद्दल सर्व माहिती सादर करावी व नसल्यास विहित नमुन्यातील निवेदन अर्जदाराने व त्याचे भागीदाराने अर्जासोबत जोडावे.

१३] ज्या अर्जदारांना पूर्वी अनुज्ञप्ती मंजूर झाली होती पण काही कारणासाठी ती सध्या कार्यरत नसल्यास त्यांना पुन्हा अर्ज करणे आवश्यक आहे. त्यांच्या पूर्वी मंजूर झालेल्या अनुज्ञप्त्यांची पुनःस्थापना करण्यात येणार नाही.

१४] सध्या कार्यरत असलेली दुकाने एका गावाहून दुसऱ्या गावी इतःपर स्थलांतरीत करण्यात येणार नाहीत.

१५] दुकान गावांच्या समुहाकरिता घोषित केले असल्यास त्या समुहातील कोणत्याही गावाकरिता अर्ज करता येऊ शकेल व अर्जाचे शुल्क त्या गावाच्या लोकसंख्येशी निगडीत राहील. मात्र अर्जदाराने समुहातील ज्या गावाकरिता अर्ज केला असेल त्याच गावी दुकान उघडणे बंधनकारक राहील.

१६] अपुऱ्या कागदपत्रासह सादर केलेले अर्ज स्विकारले जातील व अर्जाच्या छाननीच्या वेळेपर्यंत कागदपत्रे स्विकारली जातील. मात्र छाननीच्या वेळी जे अर्ज अपुरे असतील त्यांचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

१७] ज्या गावाकरिता दुकान उघडण्याचे घोषित केलेले नसेल त्या गावा-करिता आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१८] मुदतीनंतर प्रत्यक्ष सादर केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत तसेच मुदतीनंतर पोस्टाने प्राप्त झालेल्या अर्जाचाही विचार केला जाणार नाही.

१९] प्रत्यक्ष अर्ज सादर करणाऱ्या अर्जदारांनी/प्रतिनिधींनी अर्जाची व अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राची पोच घेणे अर्जदारावर बंधनकारक राहील. पोष्टाने प्राप्त झालेल्या अर्जाना पोष्टानेच पोच देण्यात येईल. पोष्टाने अर्ज पाठविणाऱ्या अर्जदारांनी स्वतःचा पत्ता लिहिलेला लिफाफा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

२०] विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी दिनांक रोजी [ येथे छाननी करण्याच्या जागेचा पत्ता देणे ] या ठिकाणी वाजल्यानंतर निवड समितीच्या सदस्या समक्ष व उपस्थित अर्जदार/प्रतिनिधी समक्ष करण्यात येईल.

२१] छाननी मध्ये अपात्र ठरलेल्या अर्जदारांची यादी अधीक्षक दारुबंदी व उत्पादन शुल्क, यांचे कार्यालयात दिनांक रोजी लावण्यात येईल.

२२] अपात्र ठरलेल्या अर्जदारांना यादी प्रसिध्दी केल्याच्या दिनांकापासून सात [७] दिवसांचे आत निवड समितीपुढे प्रतिवेदन सादर करता येऊ शकेल व निवड समिती प्रतिवेदनावरील निर्णय "समितीली" देईल.

२३] पात्र अर्जदारामधून [लॉटरी] सोडत पध्दतीने दिनांक. रोजी ठिकाणी यशस्वी अर्जदारांची निवड करण्यात येईल व त्या दिवशी अर्जदार वा त्याचे अधिकृत प्रतिनिधी त्या ठिकाणी उपस्थित राहू शकतील.

२४] निवड झालेल्या यशस्वी अर्जदाराने विहित वेळेत अनुज्ञप्ती कार्यान्वित करण्याबाबतचे निवेदन विहीत कालावधीत सादर करणे हि आवश्यक असून असे निवेदन मुदतीत सादर न केल्यास निवड रद्द समजण्यात येईल.

२५] निवड झालेल्या अर्जदार/भागीदारांचे पूर्व चारित्र्य अनुज्ञप्ती मंजूरी करिता सदोष आढळल्यास निवड रद्द करण्यात येईल.

२६] वरील स्तंभ क्रमांक २४ व २५ मधील कारणास्तव वा अन्य कारणास्तव निवड रद्द केल्यास त्या दुकानाकरिता उर्वरीत यशस्वी पात्र अर्जदारातून [लॉटरी] सोडत पध्दतीने फेर निवड करण्यात येईल.

नमुना :- नवीन सी.एल. ३ अनुज्ञप्ती करिता अर्जदाराने अर्जासोबत द्यावयाची निवेदने.

---

[अ] अनुसूचित अनुज्ञप्ती धारण करीत असल्यास -

मी/आम्ही ____________________ या निवेदनाद्वारे जाहीर करतो की, मी/आम्ही शासन आदेश, गृह विभाग क्रमांक डीएनएस ०८७९/४१५८/१८६/पीआरओ-१ दिनांक ९.१.१९८० अन्वये घोषित केलेल्या अनुसूचित अनुज्ञप्त्यांपैकी कोणतीही अनुज्ञप्ती धारण करत नाही/पुढे नमूद केलेल्या अनुज्ञप्त्या धारण करीत आहोत :

| अ.क्र. | अनुज्ञप्तीचा प्रकार. | कोणाच्या नावे अनुज्ञप्ती आहे. [भागिदार वगैरे] | अनुज्ञप्तीचा क्रमांक. | इतर माहिती. |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| | | | | |

मला/आम्हांला माहीत आहे की, मुंबई उच्च न्यायालयाच्या दावा क्रमांक २७४/१९८१ मधील निर्णयाप्रमाणे सीएल ३/एमएफ-२ व्यतिरिक्त इतर अनुसूचित अनुज्ञप्ती धारण करणारी व्यक्ती/कुटुंब सीएल-३ अनुज्ञप्ती धारण करु शकत नाही. तसेच मला/आम्हांला माहित आहे की, न्यायालयाच्या उपरोक्त दाव्यातील निर्णयाप्रमाणे मला/आम्हांला सीएल-३ व एफएल-२ अनुज्ञप्त्या एकत्रित धारण करता येऊ शकतात. मात्र उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयाविरुध्द सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यात आले असून त्या अपिलाचा निर्णय माझ्यावर/आम्हांवर बंधनकारक राहील व त्या निर्णयानुसार आवश्यक ठरल्यास मी दिलेली अनुज्ञप्ती शासनाकडे बिनशर्त परत करीन.

[ब] एका दुकानाकरिता एकापेक्षा अधिक अर्ज न करण्याबाबत :

मी/आम्ही ________________ या निवेदनाद्वारे जाहीर करतो की, मी/आम्ही जिल्हाधिकारी ______________ यांनी दिनांक ____________ च्या जाहिरनाम्याद्वारे नवीन सीएल-३ अनुज्ञप्तीकरिता मागविलेल्या कोणत्याही एका दुकानाकरिता एकापेक्षा जास्त अर्ज सादर केलेले नाहीत.

[क] मुं. दा. का. १९४९ च्या कलम ५४ [१] [ड] मधील शिक्षेबाबत :-

मी/आम्ही ____________________ या निवेदनाद्वारे जाहीर करतो की, मला/आम्हांला मुंबई दारुबंदी कायदा १९४९ च्या कलम ५४ [१] [ड] मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे शिक्षा झालेली नाही.

....

[ड] अनुज्ञप्ती रद्द न झाल्याचे निवेदन -

मी/आम्ही ______________________ या निवेदनाद्वारे जाहीर करतो की, मला/आम्हांला मुंबई दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत किंवा अन्न व औषध प्रशासनांतर्गत पूर्वी मंजूर झालेली अनुज्ञप्ती, अनुज्ञप्तीची अट किंवा नियमभंग केल्याने रद्द करण्यात आलेली नाही.

मी/आम्ही सादर केलेली उपरोक्त माहिती असत्य असल्याचे आढळल्यास मला/आम्हांला मंजूर झालेली अनुज्ञप्ती मुंबई दारुबंदी कायदा १९४९ च्या कलम ५४[१] [ई] मधील तरतुदीनुसार रद्द होण्यास पात्र आहे याची मला/आम्हांला पूर्ण कल्पना आहे.

अर्जदार/भागीदारांची सही/सह्या.

लागू नसलेला मजकूर खोडावा.

पोचपावती — नमुना

अधीक्षक, दारुबंदी व उत्पादन शुल्क,
__________ यांचे कार्यालय.

अर्ज प्राप्त झाल्याचा
अनुक्रमांक.
दिनांक.

पोच देण्यात येते की, श्री/श्रीमती/सर्वश्री .................... रा. ........ ता. .................... यांच्याकडून सी. एल. ए-१ नमुन्यातील अर्ज व पुढे नमूद केलेली कागदपत्रे खालील कोष्टकात नमूद केलेल्या अनुक्रमानुसार क वर नमूद केलेल्या दिवशी प्राप्त झाली आहेत.

१] सी. एल. ए-१ नमुन्यातील अर्ज. — होय/नाही

२] ०.६५ पैसे किंमतीचा न्यायालयीन मुद्रांक अर्जात चिकटवला आहे. — होय/नाही

३] अर्जाचे शुल्क रु. .......... चे मूळ चलन अर्जासोबत जोडले आहे. — होय/नाही

४] मालकीहक्काचे/नोंदणी प्रमाण पत्राची प्रत जोडली आहे. — होय/नाही.

५] प्रस्तावित जागेचा नकाशा तीन प्रतीत. — होय/नाही.

६] भाडे पावती/जागे विषयक करार-पत्र किंवा जागेच्या ताब्याचा सबळ पुरावा सादर केला आहे. — होय/नाही.

७] जागेच्या मालकाचे संमती पत्र/ना हरकत दाखला सादर केले आहे. — होय/नाही.

८] आयकर/विक्रीकर निपटारा प्रमाणपत्र जोडलेले आहे. — होय/नाही

९] आवश्यक त्या किंमतीच्या मुद्रांकीत पेपरवरील प्रतिज्ञापत्र जोडलेले आहे. — होय/नाही.

१०] अर्जदार किंवा भागीदार एकापेक्षा अधिक अनुज्ञप्त्या धारण करीत असल्याचे/नसल्याचे निवेदन. — होय/नाही.

११] अर्जदारांना किंवा भागीदारांना मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ५४[१][ड] मध्ये निर्देशित केलेल्या कायद्याखालील शिक्षाबाबतचे निवेदन. — होय/नाही.

१२] अर्जदार/सर्व भागीदार महाराष्ट्राचा अधिवासी [मुळ रहिवासी] असल्याचा दाखला. — होय/नाही.

२३] इतर कागदपत्रे [वर्णन पावे] | होय/नाही.

१] मी दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांची पोच मला बरोबर मिळाली आहे. त्याबाबत माझी काहीही तक्रार नाही.

अर्ज व कागदपत्रे स्विकारणाऱ्या अधिकाऱ्यांची सही.

२] अर्जाच्या छाननीच्या व सोडतीच्या ठिकाणाची व वेळेची मी नोंद घेतली आहे.

अर्जदार/अर्ज सादर करणाऱ्याची सही.

टीप :- १] अर्ज व/किंवा त्या सोबतची कागदपत्रे स्विकारली म्हणजे त्यातील नोंदी मान्य/स्वीकार्ह आहेत असे गृहीत धरू नये.

२] अपूरी कागदपत्रे छाननीच्या दिवसापर्यंत सादर करण्यास मुभा आहे.

नमुना नोंदवहीतील रकाने

सी. एल. नवीन अनु[illegible] करिता प्राप्त झालेल्या अर्जांची नोंदवही

दिनांक रोजी प्राप्त झालेले अर्ज.

| अ. क्र. | अर्जदाराचे नांव | अर्जदाराचा पत्ता | ज्या ठिकाणच्या दुकानाकरिता अर्ज आहे ते ठिकाण | अर्जासोबत प्राप्त झालेली कागदपत्रे | | | | | | | इतर कागदपत्रे | अर्ज स्विकारणाऱ्या अधिकाऱ्याची सही. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अनुज्ञप्ती शुल्क चलन | आगी दूरी पत्र/नादशी प्रमाणपत्र. | जागेचे नकाशे | जागा मालकाचे संमती पत्र/भाडे पावती | थकबाकीदार नसल्याचे दाखले/प्रतिज्ञा पत्र. | ऐपतीचा दाखला [रक्कमेसह] | अनुसूचित अनुकंपल्या आजिते निवेदन. | | |
| १. | २. | ३. | ४. | ५. | | | | | | | ६. | ७. |

नमुना: गाळ्या१९ अनुसूचि तक्ते तयार करावे.

अ] ज्या गांवी/शहरी दुकान चालवायचे त्या गावाचे
किंवा गावांच्या समुहाचे वा शहराचे नांव.

ब] उघडण्यात चालवायच्या दुकानांची संख्या.

| अ.क्र. | अर्जदाराचे/भागीदारांची नांव/नांवे | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक. | अर्जाचे योग्य शुल्क भरले आहे/नाही. | रहिवाशी दाखला/दाखले जोडला आहे/नाही. | ऐपतीचा योग्य दाखला आहे/नाही. | अनुसूचित अनुज्ञप्तीचा दाखला आहे/नाही. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १ | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४ | | | | | | |

| कलम५४[१][ड] खालील विशेष निवेदन आहे/नाही. | पूर्वी अनुज्ञप्ती रद्द झाल्याचे निवेदन आहे/नाही. | एका दुकानासाठी एकच अर्ज निवेदन आहे/नाही. | एकबाकी नाही प्रमाणपत्र/निवेदन आहे/नाही. | अपुऱ्या कागद पत्रा विषयी नोंद [क्रमांकासह] | समितीचे अभिप्राय निवडीस पात्र/अपात्र. | समिती सदस्यांच्या सह्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. |

क्रमांक ........ चे अर्जदारांना निवडीसाठी अपात्र ठरविण्यांत आले आहे.